"How women became empowered"
Sayali Samarth

# स्त्री अबला कशी बनली?

बाया म्हटल्या की, त्या दुबळ्या, भित्र्या, परावलंबी असे समीकरण चटकन केले जाते. अशा पुष्कळ बायका आपल्याला भेटतातही. पण बायका नेहमीच दुबळ्या होत्या का ? खरं म्हणजे आपण जरा भोवताली पाहिले तर आपल्याला दिसते की शेतकरी बायका, आदिवासी बायका, बांधकामावर काम करणाऱ्या मजूर स्त्रिया मुळीच दुबळ्या नसतात. तरीसुद्धा स्त्री जात म्हणजे दुबळी अशी कल्पना समाजामध्ये रूढ झालेली आहे. भोवतालच्या परिस्थितीवरून, काम करण्याच्या पद्धतीवरून बायकांची मनोधारणा बनत असते. मग ही दुबळेपणाची भूमिका स्त्रियांना का व केव्हा स्वीकारावी लागली ?

ही भूमिका फक्त भारतीय बायकांपुरती मर्यादित नाही. आज कालच्या प्रगत पाश्चात्य देशांमध्ये पण हीच परिस्थिती आढळते. तेथील बायकादेखील स्वतःला दुबळ्या, परावलंबी समजतात. काहींना तर त्यामध्ये अभिमानही वाटतो. साहित्य, सिनेमा, नाटक अशा करमणुकीच्या माध्यमातूनही स्त्रीचे चित्र दुबळी, परावलंबी असेच रंगविले जाते. स्त्रीची ही भूमिका केव्हा आणि कशी निर्माण झाली हे समजण्यासाठी इंग्लंडमधील गेल्या ३०० वर्षांतील सामाजिक बदल विचारात घ्यावा लागेल. कारण मानवी इतिहासातील हा प्रचंड बदल – ज्याला औद्योगिक क्रांती असे नाव आहे त्याला सुरुवात इंग्लंडमध्ये झाली.

## औद्योगिक क्रांती

इंग्लंड म्हटले की गजबजलेली, मोठमोठी शहरे, प्रचंड कारखाने असे चित्र आपल्या डोळ्यांसमोर उभे राहाते. पण इ. स. १७०० च्या सुमारास इंग्लंड हा शेतीप्रधान देश होता. स्वतःच्या जमिनीच्या तुकड्यावर पोट भरणारा किंवा खंडाने जमीन घेऊन ती कसणारा शेतकरी हा इंग्लंडच्या अर्थरचनेचा कणा होता. त्या काळात तेथील बहुसंख्य स्त्रियापण शेतात राबत असत. आपल्या शेतकरी बायकांसारख्या त्या पण जबाबदारीने पुरुषांबरोबर शेतात काम करीत. दुधापासून लोणी, चीज इत्यादी पदार्थ बनविणे, अंडी, चीज इत्यादी वस्तू बाजारात नेऊन विकणे ही कामे बायका करीत. त्यामुळे त्यांना व्यवहाराचे व बाजाराचे उत्तम ज्ञान होई. त्यांना स्वतःचे उत्पन्नही मिळत असे. अशा तऱ्हेने बहुसंख्य बायका स्वतःच्या कसबावर जगत होत्या. जमीनदार वर्गातील बायका सोडल्या तर सर्व बायका कष्ट करणाऱ्या होत्या. फुलांसारख्या अलगद वाढवलेल्या अशा दुबळ्या स्त्रियांचा एक विस्तृत विभाग समाजामध्ये तयार झालेला नव्हता.

इंग्लंडमध्ये व्यापार आणि उद्योगधंदे हळूहळू वाढत गेले. पैशाचे महत्त्व वाढले व विक्रीसाठी शेतमालाचे उत्पादन करणे किफायतशीर होऊ लागले. त्यामुळे जमिनदारांनी कुळांना हुसकून व्यापारी पद्धतीने शेती सुरू केली. तसेच मोठ्या जमिनदारांनी गावाची सामायिक चराऊ जमीन बळकावून मेंढ्यांचे मोठे कळप वाढविण्यास सुरुवात केली. यामुळे हजारो लहान शेतकरी देशोधडीला लागले. काही शेतकरी मोठ्या जमीनदारांकडे शेतमजूर बनले तर काही खाणीमध्ये, गोदीत नाहीतर कारखान्यात कामगार म्हणून काम करू लागले. अशा रीतीने इंग्लंडमधील लहान शेतकऱ्यांचा वर्ग नाहीसा झाला आणि त्याबरोबर ह्या कुटुंबातील स्त्रियांचा अर्थार्जनाचा पारंपरिक मार्ग बंद पडला.

१८०० च्या सुमारास यंत्राचा वापर करून वाफेची शक्ती वापरून मोठ्या प्रमाणावर उत्पादन इंग्लंडमध्ये सुरू झाले. एकामागून एक नवीन शोध लागून कापडनिर्मितीचा वेग हजारोपटीने वाढविता आला. अर्थात ह्यासाठी कामगारांची आवश्यकता होती. स्वाभिमानी शेतकरी वर्गाचे रूपांतर गलिच्छ आणि कोंदट वाता-

भरणात, अत्यंत कमी पगारात काम करणाऱ्या कामगार वर्गात झाले. वाफेच्या इंजिनाचा वापर वाढला तेव्हा कोळसा, लोखंड मोठ्या प्रमाणावर निर्माण करण्याची गरज भासली. ह्यासाठी मोठमोठ्या खाणी सुरु झाल्या. यंत्राच्या वापराने उत्पादनाचे प्रमाण वाढवता आले; ह्या नवीन शोधामुळे कारखान्यात, खाणीत काम करणाऱ्या कामगाराला मात्र अनेक वेळा अपघातास बळी पडावे लागले.

कामगारांना कमीत कमी पगारात राबवले तर कारखानदारांना जास्त नफा सुटणार. पुरुषांपेक्षाही कमी वेतन देऊन स्त्रियांना आणि ८–९ वर्षांच्या मुलांना राबविणे शक्य होते. कामगार कुटुंबाला एका माणसाच्या पगारावर जगणे शक्य नव्हते. परिणामी बायका आणि लहान मुले मोठ्या संख्येने कारखान्यांत काम करू लागली. रोज त्याना १४–१६ तास काम करणे भाग पडे. शिवाय कामाची शाश्वती नाही ती नाहीच. अशा रीतीने कामगारवर्ग मालकाचा अंकित बनला.

ह्या काळात भांडवलदार वर्गाची संपत्ती झपाट्याने वाढत होती. पण कामगार वर्गाचे जीवन मात्र भयानक झाले होते. स्त्री मजुरांच्या कारखान्यातील रात्रपाळ्या, शहरातील चाळीमधील अत्यंत गर्दीच्या आणि गलिच्छ वातावरणातील जीवन, त्यांच्या लहान मुलांचा खाणीत व कारखान्यात वापर ह्यामुळे कामगारांचे कौटुंबिक जीवन नष्ट झाले होते. काही प्रतिष्ठितांनी कामगारवर्गातील अनैतिकतेबद्दल आरडाओरड सुरू केली. आपल्या स्त्रियांना ह्यापासून दूर ठेवले पाहिजे, त्यांच्या नाजूक मनाला अशा जीवनाच्या जाणिवेपासून सुरक्षित ठेवले पाहिजे असा विचार उच्च आणि मध्यमवर्गामध्ये दृढ होऊ लागला.

## पांढरपेशा वर्गाची वाढ

इंग्लंडमध्ये आधुनिक उद्योग व व्यापार यांच्या वाढीबरोबर उच्च व मध्यम वर्ग वाढत होता. तंत्र व शास्त्र यांची प्रगती, आणि कारखानदारीची वाढ यांबरोबर शिक्षण, संशोधन, कायदेकानू, व्यवस्थापन, हिशेबतपासणी इत्यादी बौद्धिक कामाची मागणी वाढत गेली आणि पांढरपेशा वर्ग वाढीस लागला. व्यावसायिक, व्यवस्थापक, व्यापारी, कारखानदार इत्यादी पेशातील पुरुष, कुटुंबाला सुस्थितीत राहाण्याएवढी मिळकत मिळवू शकत होता. शहरांमध्ये खेडेगावाप्रमाणे स्त्रि घरच्याघरी उत्पादक काम सहजी उपलब्ध नव्हते. त्या नवऱ्याने नोकरीधंदा करावा व बायकोने घर सांभा अशी विभागणी पांढरपेशा नागर–समाजात रुजू ला आपल्या यशाचे आणि श्रीमंतीचे प्रदर्शन करण्या बायकोने व मुलींनी नटावे, नाजूकपणे वावरावे हे प्र ष्ठितपणाचे लक्षण बनले. बायकांची हुषारी, पारंग याचे महत्त्व कमी होऊन त्या ऐवजी सुस्थितीती बायकांनी नक्षीकाम, भरतकाम, हस्तकला शिका घराची सजावट करावी याचे स्तोम माजले.

बायकामुलींनी नटण्यात आणि घर सजविण्य गुंतण्याने दोन गोष्टी झाल्या. एकतर त्यामुळे स वर्गात नवनवीन गरजा निर्माण होत गेल्या. व त्या आधारे उद्योग काढण्यास मदत झाली. दुसरे म्ह वाढत्या स्पर्धेच्या वातावरणात माणसा–माणसां तणाव आणि परकेपणा वाढत असताना टिकाव धर साठी कौटुंबिक जीवन ह्या पुरुषाचा आसरा बन पुरुषाने बाहेरचा कामधंदा पाहावा, त्याला घरा कामाची तोशीश पडू नये यासाठी बायकोने घ राहावे, घरामध्ये आनंददाई वातावरण ठेवण्यास झटावे, घर सजवावे, सुग्रास अन्न बनवावे, नवऱ्या मर्जी संभाळावी आणि मुलांना वाढवावे हेच बायक कर्तव्य बनले. म्हणजेच बायकांना सर्वस्वी दुय्यम स्था पत्करावे लागले. आर्थिक दृष्ट्या परावलंबी आ सामाजिक दृष्ट्या कनिष्ठ असे. शिक्षण घेऊन क वाढवून स्वतःच्या पायावर उभे राहाणे, व्यक्ती म्ह आर्थिक, सामाजिक जबाबदारी घेणे आणि स्व व्यक्तिमत्व घडविणे याची संधी बायकांना नाकार येऊ लागली. बायका घराच्या चार भिंतीआड 'सुर राहून 'अबला' बनू लागल्या. उच्च वर्गीयांमध्ये बायकांनी नटणे–थटणे व नाजूकपणा कमावणे आदर्श बनला. मध्यम वर्गीयही त्याचे अनुकरण लागले.

श्रीमंत कुटुंबात नोकर चाकर असल्याने कांना साराच वेळ मोकळा मिळू लागला. मग कुटणे, कुटाळक्या, विलासी खाने, नाचरंग यातच बायकांचे आयुष्य गुरफटून गेले. परिणामी उच्च मध्यमवर्गीय बायकांचे 'स्वत्व' लोपले. त्या

दिखाऊ बाहुल्या बनल्या. श्रीमंत नवरा मिळवणे आणि ऐषारामात राहणे हाच त्यांचा आदर्श बनू लागला. सोनेरी पिंजऱ्यातील निरर्थक जीवनाची जाणीव होऊन काही स्त्रिया बंड करून बाहेर पडल्या. शिकल्या, नोकरी व्यवसाय करू लागल्या, पण त्या फार मोजक्या होत्या. अशा रीतीने एका बाजूला सधन वर्गातील ऐषारामात राहाणाऱ्या मोजक्या स्त्रिया तर दुसऱ्या बाजूला अहोरात्र घरीदारी राबणाऱ्या कामगार वर्गातील असंख्य स्त्रिया, भरभराटीबरोबर वाढते दारिद्र्य असे परस्परविरोधी चित्र इंग्लंड-युरोपमध्ये निर्माण झाले. ह्याचा उद्रेक १७८९ मध्ये फ्रेंच क्रांतीमध्ये झाला. स्वातंत्र्य, समता, बंधुत्वाच्या घोषणा देऊन फ्रेंच जनता मानवी हक्कांसाठी लढली. परंतु क्रांतीचे वारे विरले आणि कामगाराला अजूनही त्याच्यापाशी 'उपासमार भोगायचे' च स्वातंत्र्य आहे असे आढळून आले.

## कामगार संघटनेचा उदय

ह्या पार्श्वभूमीवर कामगार वर्ग हळूहळू संघटित होऊ लागला. संघटना बांधणे म्हणजे जीवाशी गाठ होती. इंग्लंडमध्ये १८२५ पर्यंत संघ स्थापण्याबद्दल काळ्या पाण्याची शिक्षा व यंत्राची मोडतोड केली तर फाशीची शिक्षा कामगारास होत असे. परंतु कामगार वर्गाने धडाडीने व नेटाने अनेक उग्र लढे दिले. ह्या चळवळीतून हळूहळू सुधारणेचे कायदे करणे सरकारला भाग पडले. कामाचे तास कमी करणे आणि वेतनाचा किमान दर निश्चित करणे इत्यादी संरक्षणात्मक कायदे संमत झाले. १८३२ मध्ये स्त्री-कामगारांच्या प्रश्नावर पहिली चौकशी समिती नेमली गेली. प्रतिष्ठित भांडवलदार वर्गाचे लक्ष प्रथमच कारखान्यातील कामाच्या परिस्थितीकडे वळले. बायका व मुलांना कारखान्यात राबवण्याबद्दल कायदे करण्यात आले. बायका आणि लहान मुले तासनतास कारखान्यात राबली तर कौटुंबिक जीवन उद्ध्वस्त होईल आणि समाजातील कुटुंबसंस्था मोडकळीस येईल आणि त्यामुळे नवा कामगारवर्ग जोपासणे कठीण जाईल ह्या भीतीमुळे भांडवलदार वर्गाने ह्या सुधारणा मान्य केल्या. कारखान्यांमधून कुशल कामगारांची जरुरी जशी वाटू लागली तसे कामगारांना शिक्षण देणेही आवश्यक झाले. शिक्षित कुशल कामगार तयार करणे अधिक खर्चिक होते. त्यामुळे कामगारांच्या जीविताबद्दलची बेपर्वाई काहीशी कमी झाली. परिणामी आरोग्य व शिक्षणाच्या सोई निर्माण होऊ लागल्या.

## स्त्रीची हक्कांसाठी धडपड

या काळात स्त्रीला राजकीय, आर्थिक व नागरिक हक्क नाकारलेले होते. फ्रेंच राज्यक्रांतीपासून स्फूर्ती घेऊन स्त्रीच्या ह्या दडपलेल्या स्थितीत सुधारणा होण्यासाठी इंग्लंडमध्ये चळवळींना प्रारंभ झाला. मेरी वूलस्टोनक्राफ्टने १७९२ मध्ये स्त्रीला माणूस म्हणून जगता आले पाहिजे, त्यासाठी शिक्षणाची सोय व नागरी व राजकीय हक्क मिळाले पाहिजेत असे हिरिरीने मांडून स्त्री-मुक्ती चळवळीचा पाया रोवला. व्यापार व उद्योगाच्या वाढीसाठी खुल्या व्यापाराची व मजुरांच्या स्थलांतराची तसेच शिक्षणाची वाढ होणे जरूर असल्याने व्यक्तिस्वातंत्र्य व उदारमतवाद वाढीस लागला. ह्या वातावरणात स्त्रीच्या हक्कांकडेही काही प्रमाणात लक्ष वेधले गेले. जॉन स्टुअर्ट मिलने १८६७ मध्ये स्त्रियांना मतदानाचा हक्क मिळावा म्हणून पार्लमेंटमध्ये मागणी केली. स्त्रीच्या शिक्षणाचा हक्क फ्लॉरेन्स नायटिंगेलने आग्रहाने मांडला. तिच्या मते, अन्नाविना उपासमार झाली व त्याकडे लक्ष वेधले तर ते मान्य होते. पण स्त्रियांच्या बुद्धीची, कर्तृत्वाची जी उपासमार होत आहे त्याकडे लक्ष वेधले तर मात्र त्यांचा उपहास होतो.

स्त्रियांना कमी मजुरीत राबवता येत असल्याने कारखान्यांमधून स्त्रियांना नेमून पुरुषांना काम मिळत नाही अशी तक्रारही या काळात होत होती. एमा पॅटरसनच्या पुढाकाराने १८७७ मध्ये 'वूमेनस् ट्रेड युनियन लीग' स्थापन होऊन पुरुष व स्त्री यांमध्ये कोणत्याही तऱ्हेचा भेदभाव होऊ नये, दोघांच्या कामाचा हक्क मान्य व्हावा म्हणून झगड्यास तोंड फुटले. स्त्रियांच्या शिक्षणासाठी, राजकीय हक्कांसाठी, आर्थिक हक्कांसाठी स्त्रियांनी संघटित चळवळी उभारल्या. अनेकांनी तुरुंगवास व शिक्षा भोगली. हा झगडा जवळपास १०० वर्षे चालू होता.

इंग्लंडमध्ये विसाव्या शतकात अनेक कायदे संमत होऊन स्त्रीचे दुय्यम स्थान कायद्यात तरी बऱ्याच अंशी बदलले. १९२५ मध्ये विवाहीत स्त्रियांना मुलांचे कायदेशीर पालकत्व मिळाले. १९२८ मध्ये मतदान व उमेदवारीच्या हक्कावर शिक्कामोर्तब झाले.

## स्त्रीचे आर्थिक स्थान

नागरी उद्योगधंद्याच्या वाढीबरोबर अनेक पांढर-पेशे व्यवसाय व सेवाउद्योग वाढत गेले. यामधील अनेक व्यवसाय–कारकून, नर्स, शिक्षिका, वाढपी, विक्रेती इत्यादी व्यवसाय–स्त्री-सुलभ गुणांना साजेसे समजले जात असल्यामुळे या व्यवसायातून स्त्रिया काम करू लागल्या. विशेषतः पहिल्या महायुद्धाच्या काळामध्ये पुरुष लढाईमध्ये आणि अनेक युद्धोपयोगी उद्योगात गुंतल्याने बायकांना नवीन व्यवसायातून प्रवेश मिळाला आणि नोकरी धंदा करणाऱ्या बायकांची संख्याही बरीच वाढली. अजूनही स्त्रियांची नोकरी ही तात्का-लीक सामाजिक गरज भागवण्यापुरती असाच दृष्टीकोन होता. पुरुष सैन्यातून जसे परतू लागले तसतसे स्त्रियांना नोकरी टिकवणे अवघड होऊ लागले.

१९३० च्या जागतिक मंदीनंतर तर जर्मनीमध्ये फॅसिस्ट सरकारने पद्धशीरपणे नोकरीतून व व्यव-सायांतून स्त्रियांची हकालपट्टी केली. युद्धाची प्रचंड तयारी आणि स्त्रियांची कामातून हकालपट्टी हा बेका-रीच्या भेडसावणाऱ्या प्रश्नावर तोडगा म्हणून हिटलरने पुढे आणला. त्याचा परिपाक दुसऱ्या जागतिक महा-युद्धात झाला. त्या काळात स्त्रीचे गृहिणी व माता हे स्थान जे ‘आदर्श’ ठरविण्यात आले त्यातून बाहेर येण्यास जर्मन स्त्रीला कठीण बनले.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात स्त्रिया फार मोठ्या प्रमाणात कामासाठी बाहेर पडल्या. याचे बरेच दूर-गामी परिणाम झाले. स्त्रीला अनेक नव्या क्षेत्रांतून काम करण्याची संधी मिळाली. आणि त्यांची कुवत कमी पडत नाही हे मान्य झाले. स्त्रियांनी कुटुंब सांभाळावे व पुरुषांनी कुटुंबाचे पालनपोषण करावे ही विभागणी कालबाह्य ठरू लागली. घरकाम आणि कुटुंब यांविषयी नवा विचार करण्याची जरुरी भासू लागली.

## स्त्री-मुक्तीच्या वाटचालीतील अडसर

इंग्लंड व पश्चिम युरोपीय देशात अजूनही स्त्रियांचा भरणा स्त्री-सुलभ व्यवसायात अधिक आहे. ह्या मंदीचे अस्तित्व असले तर बेकारीचे संकट प्रथम स्त्रिया मग पुरुष ह्या क्रमाने येते. म्हणजे अर्थव्यवस्थेतील कामगारांची राखीव फौज, गरज पडेल तर कामाला घ्यावे नाहीतर बाहेर टाकावे यांमध्ये स्त्रिया अग्रक्रमाने येतात. प्रत्येक स्त्री-पुरुषाला सामाजिक उत्पादनाच्या कामात स्थान मिळालेच पाहिजे हे अजून मान्य झालेले नाही.

या देशांतून प्रचंड भौतिक प्रगती झाली, तंत्रविज्ञान वाढले, श्रीमंती वाढली परंतु त्या बरोबर समतेच्या पायावर सामाजिक पुनर्रचना न झाल्याने अजून स्त्रीला कामाचा हक्क आणि समान सामाजिक स्थान मिळत नाही. राजकीय हक्कांसाठी व कौटुंबिक हक्कां-साठी संघटित होऊन अनेक दशके लढा देऊन स्त्रियांनी काही हक्क मिळवले. सामाजिक व आर्थिक हक्कांसाठी स्त्रियांचे झगडे चालूच आहेत. परंतु हा झगडा सबंध सामाजिक रचनेच्या मुळाशी जाऊन भिडतो. कारण जोवर नफ्याच्या प्रेरणेने अर्थव्यवहार चालतात, स्पर्धा हा सामाजिक संबंधाचा पाया आहे तोवर माणसाचा एकाकीपणा वाढत राहाणार आणि जीवन सुसह्य होण्यासाठी कुटुंबातच तेवढा आसरा उरतो म्हणून उत्तम गृहिणीचा आदर्श स्त्रीपुढे ठेवला जाणार. या देशांमध्ये काही स्त्रिया चौकटीबाहेर पडत असल्या तरी अजूनही सधन वर्गातील बायका नाजूक, नटव्या ‘बायकी’ राहात आहेत. साहित्य, सिनेमा, नाटके यांतून केवळ भोगवस्तू म्हणून स्त्रीचे चित्रण होत आहे. भांडवलशाहीच्या उदयाबरोबर ज्या ‘आदर्शां’नी स्त्रीला ग्रासले त्याचे सावट टिकून आहे. त्यातून बाहेर पडून स्वाभिमानी, स्वतंत्र आणि सत्वशील मानव म्हणून स्थान मिळविण्यासाठी समाज परिवर्तनाच्या लढ्यातून वाटचाल करावी लागेल हे आता स्पष्ट होऊ लागले आहे. आणि इंग्लंड युरोपमध्ये त्या दिशेने स्त्री–मुक्ती चळवळीची पावले पडावयास लागली आहेत.

— सायली समर्थ